# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**महागांव (जि.यवतमाळ) येथील जिल्हापरिषद माध्यमिक शाळेतील ९ वी व १० वी ची तुकडी अनुदान तत्त्वावर सुरु करण्याबाबत**

**(१) १४१ (२२-१२-२०१४). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत इयत्ता ९ वी व १० वी ची तुकडी अनुदान तत्त्वावर सुरु करण्याबाबत महाराष्ट्र राज्य उर्दू संघटनेने अनुक्रमे दिनांक १० सप्टेंबर, २०१३ व ७ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या निवेदनात केलेल्या मागणीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यवतमाळ यांनी दिनांक १६ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२८-०२-२०१९) :** (१) याबाबत दि. १६/०८/२०१४ अन्वये शासनास प्रस्ताव सादर झाला होता.

(२) शासनाने दि. ०१/०७/२०१५ अन्वये सदर शाळेस इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग सुरु करण्यास परवानगी दिली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**काखे (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) गावामधील एका खाजगी शिक्षण संस्थेत अनुदानित पाचवीचा वर्ग सुरु असल्याबाबत**

**(२) १४८०५ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काखे या गावामध्ये एका खाजगी शिक्षण संस्थेमध्ये अनुदानित पाचवी इयत्तेचा वर्ग सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागाच्या नियमानुसार अशा गावामध्ये पटसंख्येचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांना पाचवीचा वर्ग जोडला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्यकार्यकारी अधिकारी कोल्हापूर यांनी जिल्हा परिषद शाळेचा पाचवीचा वर्ग बंद करणे विषयी लेखी सुचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पाचवीचा वर्ग अजुनही सुरु आहे त्यामुळे गावातील खाजगी माध्यमिक शाळेच्या पाचवीच्या पटसंख्येवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हा परिषद शाळेचा पाचवी चा वर्ग तातडीने बंद करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

**ॲड. आशिष शेलार (२८-०२-२०१९) :** (१) सदर ठिकाणी खाजगी अनुदानित इयत्ता ५ वी ते १० वी ची शाळा आहे.

(२) एक कि.मि. च्या आत त्याचमाध्यमाची शाळा नसल्यास इयत्ता ४ थी च्या शाळेस इयत्ता ५ वी चा वर्ग जोडण्याबाबत शासन निर्णय दि. २/७/२०१३ अन्वये आदेश दिले आहेत.

(३) सदर इयत्ता ५ वी च्या वर्गास शिक्षण संचालक यांची मान्यता नसल्याने जून २०१५ पासून वर्ग बंद केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अहमदनगर अमरावती, औरंगाबाद, जळगांव ,कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, रायगड, सोलापूर, ठाणे या १३ जिल्हयातील ५३७ शाळा डोनेशन घेत असल्याबाबत**

**(३) ३१३३७ (२१-०६-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अहमदनगर अमरावती, औरंगाबाद, जळगांव, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, रायगड, सोलापूर, ठाणे या १३ जिल्हयातील ५३७ शाळांनी गरीबांच्या जागा वगळून डोनेशन घेतल्याचे शासनाच्या माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजीच्या शासनाच्या परिपत्रकाचे उल्लंघन करणाऱ्या दोषी शाळांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) नसल्याची, त्याची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०८-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील ८२ प्राथमिक शिक्षकांना अतिरिक्त ठरविल्याबाबत**

**(४) ३३७८२ (२१-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील ८२ प्राथमिक शिक्षकांना नियमबाह्य पध्दतीने अतिरिक्त ठरविल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, उमरगा-लोहारा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) तसेच उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती व केव्हापर्यंत कार्यवाही होणे अपेक्षित आहे?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) :** (१), (२), (३) व (४) उस्मानाबाद जिल्हयातील १२६ निमशिक्षकांना दिनांक २७.०३.२०१७ च्या आदेशान्वये प्राथमिक शिक्षक पदावर सामावून घेण्यात आलेले आहे.

---

**प्राथमिक शाळामधील कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन शिक्षकांच्या मानधनाबाबत**

**(५) ३३७८६ (२१-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर.टी.ई.-२००९ च्या अनुषंगाने निर्माण झालेल्या इतर प्राथमिक शाळामधील कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन शिक्षकांच्या ५००० मानधना संबंधातील व महाराष्ट्रातील ३३५६ शाळांच्या पुढील ५ महिन्यांच्या अनुदानासंदर्भातील मागण्या गांभीर्याने विचारात घेणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३० डिसेंबर, २०१२ रोजी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) :** (१), (२) व (३) राज्यातील प्राथमिक शाळेतील कला, क्रिडा व कार्यानुभव अंशकालीन शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या विविध मागण्यांसंदर्भात**

**(६) ३८३४९ (२२-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शिक्षकांनी त्यांच्या विविध मागण्यांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ वा त्यासुमरास राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये जूनी पेन्शन योजना लागू करणे, आंतर जिल्हा बदलीसाठी राज्यस्तरावर एकच रोस्टर करणे, शिक्षकांना शाळाबाह्य कामातून वगळणे, विना अट मुख्याध्यापक पद मंजूर करणे इ. त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, यांच्या विविध मागण्यांसंदर्भात तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधितांची बैठक बोलविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**ॲड. आशिष शेलार (२८-०२-२०१९) :** (१) व (२) खरे आहे.
(३), (४) व (५) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील शाळांना मुख्याध्यापकाचे पद मंजुर करण्यासाठी संचमान्यतेच्या निकषात बदल करण्याबाबत**

**(७) ४१८०६ (१२-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये संचमान्यतेचे काम शिक्षण विभागाकडून सुरु असून संचमान्यता करताना पहिली ते पाचवी व सहावी ते आठवी शाळांचे दोन भाग करण्यात आले, यात त्या प्रत्येक वर्गाची विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन मुख्याध्यापकाचे पद मंजूर केले जाईल अशी तरतुद करण्यात आली, मात्र यात कमी विद्यार्थीसंख्या असलेल्या शाळांमध्ये मुख्याध्यापकाचे पद रद्द होत असल्याने पूर्वीच्या संरचनेप्रमाणे १५० पेक्षा अधिक विद्यार्थी असलेल्या शाळांना मुख्याध्यापक पद मंजुर करावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा. शिक्षणमंत्री यांचेकडे दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी केलेल्या मागणीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) :** (१) व (२) सद्यस्थितीत शासन निर्णय दिनांक २८.०८.२०१५, दि. ०८.०१.२०१६, दि. ०२.०७.२०१६ अन्वये संचमान्यता करण्यात येत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राजक्ता विद्यालय, कौलखेड, (जि.अकोला) येथील आदिवासी समाजातील कर्मचाऱ्यावर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(८) ६४४०६ (१२-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राजक्ता विद्यालय, कौलखेड, (जि.अकोला) येथील श्री.उदयसिंग ग्यानसिंग डाबेराव, याची शिपाई सेवक या पदावर अनुसूचित जमाती मधून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजी वा त्यासुमारास नियुक्ती करुन व वैयक्तिक मान्यता प्रस्तावाची त्रुटीसहित पुर्तता करुनही शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद अकोला यांनी मान्यता दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, अकोला यांना लेखी निवेदनाव्दारे पत्र देऊनही तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही श्री. मुंकुंद, शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडून कोणतीही कार्यवाही न करता जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वैयक्तिक मान्यता प्रस्ताव त्रुटीसह सादर करुनही आदिवासी समाजातील शिपाई सेवकांवर जाणीवपूर्वक अन्याय करणाऱ्या व लोकप्रतिनिधी यांनी पाठविलेल्या पत्राची दखल न घेणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व आदिवासी समाजातील कर्मचाऱ्यांवर झालेला अन्याय तातडीने दूर करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) : (**१), (२), (३) व (४) शिक्षणाधिकारी यांची पूर्वपरवानगी न घेता नियुक्ती करण्यात आल्यामुळे वैयक्तीक मान्यता नाकारण्यात आली होती. याबाबतची वस्तुस्थिती संबंधीत लोकप्रतिनिधींना शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांनी अवगत केली आहे.

---

**राज्यातील अनेक संस्थांनी अभ्यासक्रम किंवा तुकड्या बंद करण्यासठी पाठविलेले प्रस्तावाबाबत**

**(९) ७०८४९ (२७-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातून साधारणपणे ४० ते ५० संस्थांनी अभ्यासक्रम किंवा तुकड्या बंद करण्यासाठी पाठविलेल्या प्रस्तावास शासनाने दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ पर्यंत मंजूरी दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच मंजूरी न मिळाल्यामुळे सदर संस्थांनी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मुदत ठेवीमध्ये गुंतविलेली कोट्यवधी रुपयांची रक्कम अडकून पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,शासनाने उपरोक्त संस्थांना अभ्यासक्रम / तुकड्या बंद करण्यासाठी परवानगी देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (२८-०२-२०१९) :** (१) अभ्यासक्रम किंवा तुकडया बंद करण्याचे प्रस्ताव प्राप्त नाहीत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील माध्यमिक शिक्षण विभागाकडून करण्यात आलेल्या ऑनलाईन समायोजनाबाबत**

**(१०) ७०९२४ (०५-०१-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात माध्यमिक शिक्षण विभाग, सोलापूर यांच्याकडून ऑनलाईन समायोजनाची प्रक्रिया चालू असून सदर प्रक्रियेमध्ये अनेक गंभीर स्वरूपाच्या कार्यालयीन त्रूटी असल्याने उक्त समायोजन रद्द करून त्या शिक्षकांचे पुन्हा समायोजन करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवदेन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१), (२), (३), होय. हे खरे आहे.
सन २०१५.१६ नुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत होते. तथापि सोलापूर जिल्हयातील समायोजनाबाबत संस्थांची सर्व रिक्त पदे ऑनलाईनमध्ये नोंद न झाल्यामुळे समायोजन रद्द करण्यात आले व या शिक्षकांचे समायोजन सन २०१६.१७ च्या संच मान्यतेनुसार करण्यात आलेले आहे.

---

**जिल्हयातील शिक्षकांचे समायोजन जिल्हयातच करण्याबाबत**

**(११) ७१२६५ (२७-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हयातील शिक्षकांचे समायोजन जिल्हयातच करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी दिनांक १७ सप्टेंबर,२०१६ रोजी मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांना लेखी पत्र देवून मागणी केली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. जिल्हयातील २२४ शिक्षकांपैकी १२४ शिक्षकांचे ऑनलाईन समायोजन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील महाविद्‌यालयांनी विज्ञान शाखेच्या वाढीव तुकडीबाबत**

**(१२) ७२४२५ (२७-०१-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील चार महाविद्‌यालयांनी विज्ञान शाखेच्या वाढीव तुकडीसाठी जिल्हा परिषद च्या माध्यमिक शिक्षण विभागाकडे मागणी प्रस्ताव माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महाविद्‌यालयांना वाढीव तुकडीबाबत निर्णय देण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त महाविद्‌यालयाच्या वाढीव तुकडीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्‌य:स्थिती काय आहे ?

**ॲड. आशिष शेलार (२८-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे
(२) व (३) जळगांव जिल्हयातील ५ कनिष्ठ महाविद्यालयांना विज्ञान शाखेची तुकडी शासन निर्णय दि.१४/०६/२०१७ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मु.पो.ता.संगमनेर (जि.नगर) शहरातील डॉ.देवेंद्रलाल ओहरा महाविद्यालयाचे प्राचार्य व पदाधिकारी बेकायदेशीरपणे विद्यार्थ्यांना प्रवेश देत असल्याबाबत**

**(१३) ७४६२९ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो.ता.संगमनेर (जि.अहमदनगर) शहरातील डॉ.देवेंद्रलाल ओहरा या महाविद्यालयामध्ये कमीत कमी २५,००० रुपये डोनेशन घेऊन सदर शिक्षण संस्था व या महाविद्यालयाचे प्राचार्य व पदाधिकारी बेकायदेशीरपणे विद्यार्थ्यांना प्रवेश देत असल्याबद्दलच्या लेखी तक्रारी छात्र भारती संघटनेने अहमदनगर जिल्हा शिक्षण अधिकारी यांचेकडे केल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास, निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छात्र भारती संघटनेने ओहरा कनिष्ठ महाविद्यालयात गटशिक्षण अधिकारी, संगमनेर-अकोले यांच्याकडे लेखी तक्रार केल्यानंतरही संबंधीत गटशिक्षण अधिकारी यांनी संस्थेच्या आलेल्या तक्रारीनुसार कोणतीही चौकशी न केल्यामुळे या संपूर्ण गैरव्यवहाराला संस्थेचे गटशिक्षण अधिकारीच सहकार्य करीत असल्याने छात्र भारती संघटनेने गटशिक्षण अधिकाऱ्यांविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छात्र भारती संघटनेने गटशिक्षण अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केलेल्या प्रमुख मागण्या कोणत्या आहेत व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०५-०२-२०१९) :** (१) सदर कनिष्ठ महाविद्यालयात डोनेशन घेऊन प्रवेश करण्यात येत असल्याची तक्रार अर्ज छात्र भारती यांनी केली होती.
(२) व (३) छात्र भारती संघटनेच्या तक्रार अर्जावर चौकशी केली असून तक्रारीत तथ्य नसल्याचे निदर्शनास आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगर क्षेत्रातील खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये मुख्याध्यापकाची पदे भरण्याबाबत**

**(१४) ७७८४४ (२०-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगर क्षेत्रातील २११ खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे भरली नसल्याने सदर शाळा संचालकांना माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढया मोठया प्रमाणावर मुख्याध्यापकांची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास शासनाने सदर मुख्याध्यापकांची पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवतनाही.

---

**विदर्भासह नागपूर शहरातील शाळांनी शालेय परीवहन समिती स्थापन केली नसल्याबाबत**

**(१५) ७८६५० (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भासह नागपूर शहरातील अनेक शाळांमध्ये विदयार्थ्यांचे सुरक्षेच्या दृष्टीने परिवहनाचे नियम पाळण्यासाठी गठीत करण्यात येणा-या परिवहन समित्यांची स्थापना करण्यात आलेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय समिती स्थापन न करणा-या शाळांमध्ये ९० खासगी अनुदानीत, ९८ खासगी विनाअनुदानीत, कायम विनाअनुदानीत मदरसा गटातील शाळा, तर १७ इतर गटातील शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय परीवहन समितीने या शाळांकरीता बस,व्हॅन व ऑटोरीक्षाद्वारे शालेय विद्यार्थ्यांची वाहतुक करणा-या वाहनांकरीता एक मार्गदर्शक सुचना जारी केली असून त्या निर्णयाकडे या शाळांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, परीवहन समिती स्थापन केली नसलेल्या शाळांची स्कुल बसेस परवाना शुल्कातील सवलत रद्द करून खाजगी दराने म्हणजेच दुप्पट दरानी परवाना शुल्क आकारण्यात येणार असल्याने उक्त शुल्क हे विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वसुल केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, व त्यानुसार शालेय परीवहन समिती स्थापन करण्याकडे दुर्लक्ष करणा-या तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांकडुन दुपटीने परवाना शुल्क आकारणा-या व त्यांच्या जीवाशी खेळणा-या शाळांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२८-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) नागपूर शहरातील ९० अनुदानित ९८ विनाअनुदानीत व १७ अन्य शाळांमध्ये परिवहन समिती गठीत केलेली नाही.

(४) परिवहन समिती स्थापन केली नसलेल्या शाळांच्या स्कुलबसची कर सवलत रदद करण्याचे निदेश दिले आहेत. सदर कर परवानाधारकांकडून वसूल करण्यात येणार असून विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वसूल करणे अपेक्षित नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ज्युनिअर महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(१६) ७८७४७ (२०-०४-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन संचमान्यतेच्या त्रुटी दूर करण्याबरोबर अनेक वर्षापासून ज्युनिअर कॉलेज शिक्षकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी मुंबईत ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांनी आक्रमक पवित्रा घेतला असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांना वारंवार केवळ आश्वासनाखेरीज काहीच दिले नाही यामुळे शिक्षकांच्या संघटनेने जेलभरो आंदोलन करण्याचे घोषीत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन या ज्युनिअर कॉलेज शिक्षकांच्या रास्त मागण्यां मान्य करीत नसल्याने याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेच्या मागण्यांबाबत शासनाने वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील रसायनी परिसरातील कारखान्या मुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत**

**(१७) ७९८०० (२१-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील रसायनी परिसरात अनेक रासायनिक कारखाने असल्यामुळे परिसरात जल, वायू प्रदूषण होत असून जमीनीवर देखील वाईट परिणाम होत असून शेत जमिनी नापिक होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीअंती जबाबदार कारखान्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (०४-०४-२०१९) :** (१) अशी बाब निर्दशनात आलेली नाही.
(२) व (३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून नदीच्या पाण्याची गुणवत्ता नियमिन तपासली जाते, उपलब्ध पृथ:करण अहवालानुसार पाण्याची गुणवत्ता सर्वसाधारणपणे चांगली असल्याचे दिसून येते.रसायनी भागात उद्योगांनी औद्योगिक सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया यंत्रणा बसविलेली आहे.सदर पट्टयातील रासायनिक उद्योगाची वेळोवेळी पाहणी करण्यात येते पाहणीमध्ये काही त्रटी आढळल्यास सदर उद्योगांवर कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माध्यमिक शिक्षण विभागातील संचनिश्चिती दुरुस्तीबाबत...**

**(१८) ८३९६८ (२०-०४-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागामध्ये माध्यमिक स्तरावर सन २०१६-१७ या वर्षातील संचनिश्चितीमध्ये त्रुटी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास याबाबत कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, कोल्हापूर यांनी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ज्या शाळांच्या सेवक संचामध्ये दुरुस्ती आहे अशा शाळांच्या सेवक संचामध्ये दुरुस्ती करण्यासाठी वेळोवेळी शिबीरांचे आयोजन करुन सेवक संच दुरुस्त करुन देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवतनाही.

---

### कोल्हापूर जिल्हयात राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा झाल्या नसल्याबाबत

**(१९) ८६०५५ (२१-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात राज्यस्तरीय चार प्रकारांच्या क्रीडा स्पर्धा गत वर्षी झाल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्रीडा स्पर्धा झाल्या नसल्याने ५० लाखांचा निधी पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चार क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२५-०२-२०१९) :** (१) होय.

(२) सन २०१६-१७ या वर्षी चार राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी वितरित करण्यात आलेला निधी शासनास समर्पित करण्यात आलेला आहे.

(३) सन २०१६-१७ या वर्षी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे स्थळ निश्चित न झाल्याने स्पर्धा आयोजन करण्यात आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात बिंदुनामावलीनुसार शिक्षकांच्या नियुक्त्या व पदोन्नती करण्याबाबत

**(२०) ८६५०७ (२३-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्हयात सन १९९७ पासून बिंदुनामावलीनुसार शिक्षकांच्या नियुक्त्या व पदोन्नती करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यात शासनाने शिक्षकांच्या नियुक्त्या व पदोन्नत्या बिंदुनामावलीनुसार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) बिंदुनामावलीनुसार नियुक्ती व पदोन्नती दिली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रयत शिक्षण संस्थेत सेवा निवृत्तीने रिक्त जागा भरण्याबाबत**

**(२१) ८७५३१ (२३-०८-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रयत शिक्षण संस्थेत सेवा निवृत्तीने रिक्त झालेल्या जागा भरल्या नसल्याने शिक्षणाचा दर्जा खालावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रयत शिक्षण संस्थेत शिक्षकांची पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) शिक्षण सेवकांची रिक्त पदे भरण्याकरिता "पवित्र" प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हा परिषद प्राथमिक व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांतील अतिरीक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत**

**(२२) ८८६५७ (२३-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील ११ शिक्षक व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांतील ४५ अतिरीक्त शिक्षकांचे समायोजन करण्याचा निर्णय माध्यमिक शिक्षणाधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिका-यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार एकूण किती अतिरीक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे. सांगली जिल्हयातील खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांतील २० अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे.

---

**खासगी शाळांमध्ये कला शिक्षकांच्या नियुक्त्या करण्याबाबत**

**(२३) ९०७९२ (२३-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खासगी शाळेतील पाचवी ते सातवीच्या वर्गासाठी कला शिक्षकांची नियुक्ती बंधनकारक करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने शिक्षण विभागाला दिले असल्याची बाब दिनांक ८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इयत्ता पाचवी ते आठवी या इयत्तांसाठी कला शिक्षकांची पूर्ण वेळ नियुक्ती केली असतानाही केवळ आठवड्याला २ ते ४ तासिका दिल्या जात असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रनोक्त भाग (१) नूसार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शासनाने शासन निर्णय दि.७/१०/२०१५ व दि. ०४/०६/२०१६ निर्गमित केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हिंगोली जिल्ह्यासह राज्यमध्ये माध्यमिक शाळेच्या संच मान्यता दुरुस्त करुन समायोजन करण्याबाबत.

**(२४) ९२४३६ (२३-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यासह राज्यामध्ये माध्यमिक शाळेच्या संच मान्यतेच्या दुरुस्तीबाबत शिक्षण संचालक यांना विचारणा केली असून संच मान्यता दुरुस्त करुन समायोजन करावे अन्यथा राज्यव्यापी आंदोलन केले जाईल असा ईशाराही दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संच मान्यतेची दुरुस्ती करण्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे अतिरिक्त ठरलेले शिक्षक प्रचंड तणावाखाली आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) संचमान्यता झाल्यानंतर ज्या शाळांच्या संचा मान्यतेमध्ये दुरुस्ती आहे अशा शाळांच्या सचमान्यता शिबीराचे आयोजन करुन दुरुस्त करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात औषधे प्लास्टिक आणि पॉलिथीन टेरीप्थॅलेट बाटलीऐवजी काचेच्या बाटलीचा वापर करण्याबाबत

**(२५) ९२५७३ (२१-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औषधे प्लास्टिक आणि पॉलिथीन टेरीप्थॅलेट बाटल्यांऐवजी काचेच्या बाटलीत ठेवण्याचे निर्देश केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने अडीच वर्षापूर्वी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार काचेच्या बाटलीतून औषधे न विकणा-या व्यापा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) व (२) यासंदर्भात भारत सरकारने औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यात दुरुस्तीसाठी अधिसूचनेच्या मसूद्याचे प्रारुप दि.२९/०९/२०१४ रोजी निर्गमित केले आहे. मात्र केंद्र शासनाकडून कायद्यात बदल करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे जह सध्या PET Bottle च्या वापरावर प्रतिबंध घालण्यात आलेला नाही. सबब, काचेच्या बाटलीतून औषधे न विकणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवतनाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील प्रकल्पांमुळे होणारे प्रदूषण

**(२६) ९७३७९ (३०-१२-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात एनएमडी, ओएनजीसी, भारत गॅस, विद्युत प्रकल्प, जेएनपीटी बंदर, जीटीआय तसेच सिंगापूर पोर्ट, जेएनपीटी सेझ प्रकल्प व एमएमआरडीए सारखे महत्वाचे प्रकल्प निर्माण होत असल्याने देशातील सर्वात वेगात विकसित होणारे शहर म्हणून उरणची ओळख होऊ लागली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास (नष्ट) होत असून नाल्याचे झालेले गटारात रूपांतर तसेच हवेतील प्रदूषणा बरोबर धुळीकणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून उरण तालुक्यातील अनेक नागरिकांना हृदयविकाराचा त्रास होऊन लागला असल्याने तर सन २०१६ या वर्षापासून सुमारे २८ नागरिकांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू मुखी पडले असूनही येथील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येथील प्रशासन विभाग, सिडको अकार्यक्षम ठरले असून पर्यावरणाकडे शासनाचे व महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त जिल्हयातील नागोठणे (ता.रोहा) गावातील आदिवासी वाड्यांमध्ये दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी व उरण (ता.उरण) शहरात दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पडलेल्या पावसाच्या पाण्याबरोबर काळ्या रंगाचे रसायन पडल्याचे प्रकार घडला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पावसामुळे परिसरातील विहिरीतील पाणी काळे झाले असल्यामुळे अनेकांना पोटदुखी व डोकेदुखीचा त्रास होऊ लागला असून भातशेती तसेच भाजीपाला पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ठिकाणांचे प्रदूषण कमी करण्याबाबत व नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई व विहिरींची स्वच्छता करून शुध्द पाणीपुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (१३-०६-२०१९) :** (१) होय.
(२) हे खरे नाही,

म.प्र.नि. मंडळाने हवेतील धुळीकणांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय योजना करणेबाबत संबंधित प्रकल्पाना वेळोवेळी कळविले आहे.

हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा सुधारण्यारिता म.प्र.नि. मंडळाने उरण परिसरातील १२ स्टोन क्रशरना हवा (प्र व प्रनि कायदा १९८१ चे ३१ अन्वये) प्रस्तावित आदेश बजावले होते, तद्नंतर दि. ०६/०४/२०१८ दरम्यान जसई गावातील एकुण ११ स्टोन क्रशरला बंदचे आदेश पारित केलेले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, अलिबाग यांचे दिनांक ०८/१२/२०१७ च्या पत्रान्वये उरण तालुक्यातील प्राथमिक आरोगय केंद्र कोप्रोली याच्या कार्यक्षेत्रात जानेवारी २०१६ ते नोव्हेंबर २०१७ पर्यंत ५७ मृत्यू ऱ्हदयविकाराने झाले आहेत असे कळविले आहे परंतू स्वयंस्पष्ट कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे नाही.
(३) होय.

दि. ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी उरण परिसरामध्ये पहाणी केली. पहाणी दरम्यान बोरीपखाडी येथे पाऊस पडल्याचे सांगितले, पहाणी दरम्यान बोचर येथे पेट्रोलियम प्रोडक्सच्या टॅंकफार्मला आग लागली असल्यामुळे तेथे प्रचंड धुराचे लोट निर्माण झाले होते. त्याचा परिणाम होऊन पावसाच्या पाण्याचा रंग काळा होण्याची शक्यता आहे.

सदर बाबत बोरीपाखडी येथे मंडळाने संकलीत केलेल्या पाण्याच्या नमुन्याच्या पृथ:करण अहवालानुसार पाण्याचा सामु व ऑईल आणि ग्रिस चे प्रमाण विहित मर्यादेत असल्याचे आढळून येते
(४) दिनांक ०८ ऑक्टोबर २०१७ रोजी वा त्या सुमारास उरण ता. उरण येथे पडलेल्या उक्त पावसामुळे नागरीकांना पोटदुखी व डोके दुखीचा त्रास झाला आहे किंवा कसे या बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी अलिबाग, रायगड यांचेकडून माहिती मागवलेली असून त्यांनी दिनांक ०८ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला असून नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम

झाला किंवा कसे या बाबत नमुद केलेले नाही. तसेच शेतीनुकसानीबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रायगड यांनी दि. ०४ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये पिकाच्या नुकसानीबाबतची कोणत्याही तक्रारी आलेल्या नसल्याबाबत कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवतनाही.

---

**हदगाव (जि.नांदेड) येथील शासकीय अध्यापक विदयालय बंद पडत असल्याबाबत**

**(२७) १०१३६९ (२९-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगाव (जि.नांदेड) येथील शासकीय अध्यापक विद्यालयात एकूण २६ पटसंख्या असताना व १२ प्राध्यापकांची संख्या असूनही केवळ एकच प्राध्यापक सदर विद्यालयात उपस्थित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शासनाच्या उदासीनधोरणामुळे व शिक्षक भरती बंद असल्यामुळे या अध्यापक विदयालयात १२० विध्यार्थी संख्याची मान्यता असतानाही फक्त २२ विदयार्थी शिक्षण घेत असल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (२०-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) अध्यापक विद्यालयाची प्रवेशक्षमता १२० असून सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रथम व व्दितीय वर्षात एकुण २२ विद्यार्थी आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमराळे बु. (ता.दिंडोरी,जि.नाशिक) येथे कृषी बियाणे उत्पादक कपंनीच्या चर्चासत्र कार्यक्रमा दरम्यान दिलेल्या जेवणातून झालेली विषबाधा**

**(२८) १०१४४७ (२९-१२-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमराळे बु. (ता.दिंडोरी,जि.नाशिक) येथे कृषी बियाणे उत्पादक कपंनीच्या टोमॅटो पिक पाहणी व चर्चासत्र कार्यक्रमा दरम्यान दिलेल्या जेवणातून शेकडो शेतक-यांना विषबाधा होवून त्यात एका शेतक-याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) : (**१) हे खरे नाही.

तथापि, सदर आयोजित कार्यशाळेत ५७ व्यक्तिंना उलटी व मळमळ अशा प्रकारचा त्रास झाला असून एका व्यक्तिचा मृत्यु झाला आहे. सदर प्रकरणी घेण्यात आलेल्या अन्न नमुन्यांचे अहवाल, मयताचा शवविच्छेदन अहवाल व प्रादेशिक न्याय वैधानिक प्रयोगशाळा, नाशिक यांचा अहवाल पाहता अन्न विषबाधेचे नसल्याचे दिसून येते.
(२) सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असून पुरवठादाराकडून विश्लेषणासाठी घेतलेले ०४ अन्न नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

तसेच पोलिसांनी घटनास्थळावरुन व केटररच्या घरातून घेतलेल्या एकूण २३ अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवालात “General and specific chemical testing does not reveal any poison” असा अभिप्राय देण्यात आला आहे.

जिल्हा रुग्णालय शवविच्छेदन अहवालात Cause of Death will be given after the receipt of chemical analysis and Histopathological report of Vicera preserved असे नमूद करण्यात आले आहे.

प्रादेशिक न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक यांचे दि.१४.१२.२०१७ च्या अहवालात १) Stomach and Intestine along with its content २) Pieces of liver, lung, kidney and spleen ३) Blood बाबत “General and specific chemical testing does not reveal any poison” असा अभिप्राय देण्यात आला आहे.

पोलिसांमार्फत केटरर, मे.बायर सिड्स प्रा.लि. चे अधिकारी यांचे विरुध्द आय.पी.सी. कलम ३०४ व ३२८ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दुर्गम भागातील, आदिवासी पाड्यातील ९ हजार अप्रशिक्षित शिक्षक अतिरिक्त होणार असल्याबाबत.**

**(२९) १०१७९४ (२९-१२-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्गम भागातील आदिवासी पाड्यातील मुलांची प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी याकरिता सन २००० पासून वस्तीशाळा सुरु करण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वस्ती शाळांमध्ये ज्या ठिकाणी प्रशिक्षित उमेदवार मिळाले नाहीत त्या ठिकाणी अप्रशिक्षित १२ वी पास उमेदवारांची नेमणूक वस्तीशाळा स्वयंसेवक म्हणून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१४ मध्ये या सर्व वस्तीशाळा बंद करुन त्यातील स्वयंसेवकांना जिल्हापरिषदांच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक म्हणून समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शालेय शिक्षण विभागाने दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी महानगरपालिकांचे शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, समाजकलयाण आयुक्त, आदिवासी विकास आयुक्त व अपंग कल्याण आयुक्त यांना त्यांच्या अधिनस्थ असलेल्या सर्व शाळांमधील अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांनी दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेर प्रशिक्षण म्हणजेच (डीएड) पदविका प्राप्त करणे आवश्यक असून, प्रशिक्षण पूर्ण न करणाऱ्या शिक्षकांची सेवा समाप्त करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निर्णयामुळे राज्यातील ९००० शिक्षकांवर बेकारीची पाळी येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने १५-१६ वर्षे नोकरी केलेल्या शिक्षकांवर बेकारीची पाळी येऊ नये याकरिता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.
(५) व (६) शासन निर्णय दि. ०१.०३.२०१४ नुसार वस्तीशाळा शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले आहे.तसेच डी.एड/डि.टी.एड अर्हता प्राप्त करणेकरीता आवश्यक त्या संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

---

**राज्यात सरलवरील विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षकांची संख्या ठरविण्याच्या निर्णयाबाबत**

**(३०) १०४७६१ (०६-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सरलवरील विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षकांची संख्या ठरविण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला असून जेवढया विद्यार्थ्यांचे आधार नंबर नोंदवले जातील तेवढेच विद्यार्थी संचमान्यतेसाठी विचारात घेतले जाणार असून त्यासाठी माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास असलेली विद्यार्थी संख्या गृहीत धरण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील जवळपास ४८ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी शिल्लक असून दिनांक १ जानेवारी पर्यन्त सरल प्रणालीवर जेवढया विद्यार्थ्यांची माहिती अद्यावत झाली असेल त्या संख्येनुसार शिक्षकांची संख्या निश्चित करण्यात येणार असल्याने अनेक शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत ३ वर्षापासून शाळांतील सर्वच कामे ऑनलाईन पध्दतीनुसार नोदविण्याचे काम सुरू केल्याने शिक्षकांना खडू हातात धरण्या ऐवजी माऊस धरण्याची वेळ आली असून ऑनलाईनचे काम करण्यासाठी शासनाची साईट मंदगतीने चालणे, मध्येच साईट बंद पडणे, ऑनलाईन भरलेली माहिती साईटवरून अचानकपणे गायब होणे असे प्रकार वारंवार होत असल्याने शिक्षकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, शाळांतील विद्यार्थ्याचे आधार नंबर जर पूर्णपणे नोंदविले नाहीत तर माहे, फेब्रुवारी, २०१८ चा पगार शिक्षकांना मिळणार नसल्याचे व्हॉटसअपच्या माध्यमातून संदेश देण्यात आला हे ही खरे आहे काय, आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरील प्रक्रियेला मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक (जि.नाशिक) येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाट्यगृहासह वृद्धींगत करणे आणि नाशिक येथे सिडकोमार्फत नाट्यगृह बांधण्याबाबत

**(३१) १०६६५० (१८-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक (जि.नाशिक) येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाट्यगृहासह वृध्दींगत करणे आणि नाशिक येथे सिडकोमार्फत नाट्यगृह बांधण्यासाठी नाशिक विभाग विकास कार्यक्रम सन २००९ मध्ये नियोजन विभागाच्या दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये मान्यता देण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे माहे जानेवारी, २०१८ पर्यंत हाती घेण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर नाट्यगृहांची कामे सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (१५-०४-२०१९) :** (१) होय. खरे आहे.
(२) व (३) नाही. हे खरे नाही.

नियोजन विभागाच्या सदर शासन निर्णयान्वये कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाट्यगृहासह वृद्धींगत करण्यासाठी मान्यता देण्यात आली होती. परंतू सदर प्रतिष्ठान सिडकोमार्फत बांधण्यात आले नसून, या विभागाच्या दिनांक २१ मार्च, २०११ च्या शासन निर्णयाअन्वये रु.२,००,५६,८८०/- रकमेस दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार सन २०११ ते सन २०१३ या कालावधी दरम्यान रु.१.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला. कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे काम पूर्ण झाले आहे. तथापि, कुसुमाग्रज नाट्यगृह अशी वास्तू नसून कुसुमाग्रज स्मारकात बहुउद्देशीय असे दालन असून त्यात हौशी, प्रायोगिक नाट्य संस्था तिथे नाट्यप्रयोग करतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळामधील शिक्षकांवर शिकविण्याव्यतिरिक्त अतिरिक्त कामे सोपविल्याबाबत

**(३२) १०९२४२ (०६-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळामधील शिक्षकांवर, शिकविण्याव्यतिरिक्त ४० हून अधिक नोंदवहया, २० हून अधिक अहवाल, मध्यान्ह भोजन शिजवणे, गावातील शौचालये मोजणी, अहवाल तयार करणे, विविध अभियान राबविणे व मतदार यादया अद्ययावत करणे आदी अतिरिक्त भार शिक्षकावर सोपविण्यात येत असल्याचे, माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांवर, शिकविण्याव्यतिरिक्त अतिरिक्त कामाचा भार लादल्यामुळे, विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याच्या दृष्टीने शिकविण्यासाठी, पुरेसा वेळ उपलब्ध व्हावा याकरीता शिक्षकावरील अतिरिक्त कामाचा बोजा दूर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) :** (१), (२) व (३)

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपालिका, शिक्षण मंडळे यामध्ये प्राथमिक शाळेतील शिक्षकांना जनगणना व निवडणूक विषयक कामाव्यतिरिक्त कोणतीही अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नये, असे शासनाने दि. ०१.०८.२००८ च्या शासन निर्णयान्वये आदेशित केले आहे. सदर शासन निर्णयामध्ये राष्ट्रीय महत्वाची कामे देणे आवश्यक असल्यास ती केवळ सुट्टीच्या दिवशी व अशैक्षणिक कालावधीमध्ये देण्यात यावे, असे निर्देशित केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्यांक महाविद्यांमधील शिक्षकांच्या पदांबाबत**

**(३३) ११२२३५ (०६-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक महाविद्यालयांमधील शिक्षकांच्या पदांना मंजुरी देण्यात आली असून दिनांक २३ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये काही उमेदवारांना त्यांचे अर्ज नाकारण्यात आले असल्याचे पत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या सर्व प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचा दावा मुंबई कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनांनी शासनाकडे केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१), (२), (३) व (४) वैयक्तीक मान्यतेबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी आयोजित केलेल्या शिबीरामध्ये शासन निर्णय दि.०६.०२.२०१२ मधील तरतुदींचे पालन न करता नियुक्त केलेल्या उमेदवारांना वैयक्तीक मान्यता नाकारण्यात आल्या आहेत.

---

**मुंबईतील माऊंट कार्मेल ॲकॅडमी स्कूल व नाशिक शहरातील इमराल्ड हाईटस् पब्लिक स्कुल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मुलांना केलेली मारहाण**

**(३४) ११४३०१ (०६-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग**

**बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम)** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माऊंट कार्मेल ॲकॅडमी स्कूल (जि.चंद्रपूर)या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील के.जी.२ च्या वर्गात शिकत असणाऱ्या एका ५ वर्षाच्या मुलीने वर्गात फळयावर दिलेला गृहपाठ पूर्ण न केल्यामुळे शिक्षिकेने मारहाण केल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नाशिक शहरातील जेलरोड येथील इमराल्ड हाईटस् पब्लिक स्कुलमधील १५ विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिकेकडून अमानूष मारहाण केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमराल्ड पार्क प्रमाणेच शहरातील बहुतेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांत विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून अशा प्रकारची मारहाण होत असल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले त्यानुसार संबंधित शिक्षिकेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) व (२)होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही

(४) होय, चंद्रपूर जिल्हयातील मांऊन्ट कॉरमेल ॲकाडेमी या शाळेतील दोषी आढळुन आलेल्या शिक्षकांविरुध्द शाळा प्रशासनाकडून बडतर्फची कारवाई करण्यात आलेली आहे. नाशिक मधील शाळेतील मुख्याध्यापकास विरुध्द नाशिक रोड पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. सी.बी.एस.ई बोर्डाचे सलग्नना पामणपत्र शाळेकडे नसल्याने शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत शिक्षक संचालक (प्राथमिक) यांचेकडे शिक्षणाधिकाऱ्यांनी शिफारस केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्राथमिक स्तरावर पहिली ते चौथी च्या वर्गांना पाचवी ते सातवीचे वर्ग जोडून दिले परंतु संच मान्यता दिली नसल्याबाबत**

**(३५) ११६४१४ (०६-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक स्तरावर पहिली ते चौथी च्या वर्गांना पाचवी ते सातवीचे वर्ग जोडून दिले परंतु या पाचवी ते सातवीच्या वर्गाची संच मान्यता शासनाने दिली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिली ते चौथी च्या वर्गांना शासनाने पाचवी ते सातवीचे वर्ग जोडून दिले आहे अशा सर्व वर्गाची संच मान्यते मध्ये पदनिर्मिती करण्यात यावी अशी मागणी आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पायाभूत पदाच्या विदयार्थी संख्येमध्ये वाढीव पदांना वैयक्तीक मान्यता देण्यात यावी व अघोषित शाळा घोषित करण्यात याव्यात, ज्या शाळांना शासनाने २० टक्के अनुदान दिले आहे अशा शाळांच्या अनुदानात टप्पा वाढ करावी अशी मागणी आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलबांची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) व २) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) सदर शाळा व तुकडयांना पुढील अनुदान देण्याबाबत मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांनी दिनांक २८/११/२०१८ रोजी सभागृहात निवेदन केले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कनिष्ट महाविद्यालय शिक्षकांच्या मागण्याबाबत**

**(३६) ११६५३३ (२४-०५-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २ मे २०१२ नंतर भरती झालेल्या कनिष्ट महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता द्यावी, विनाअनुदानित कनिष्ट महाविद्यालयांना अनुदान द्यावे आदी मागण्यांसाठी शिक्षकांनी एक दिवस संप केल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयात बारावीच्या परीक्षा सुरु असल्याने काही महाविद्यालयात नियोजित करण्यात आलेल्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे देखिल खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कनिष्ट महाविद्यालयातील शिक्षकांना मान्यता व अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये दिनांक २ मे, २०१२ नंतर ना-हरकत प्रमाणपत्र न घेता नियुक्त केलेल्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्याबाबत शासनाने दिनांक १३.०३.२०१८ रोजी निर्णय घेवून त्याप्रमाणे संबंधीत विभागीय उपसंचालक यांना मान्यता देण्याबाबत कळविले आहे.

---

**रामदास पेठ (अकोला शहर) येथील सांस्कृतिक भवनाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) १२०६०८ (२०-०७-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील रामदास पेठ येथे उभारण्यात येणाऱ्या सांस्कृतिक भवनाचे बांधकाम संथगतीने सुरु असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सांस्कृतिक भवनाचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा क्रीडा संकुल समितीमार्फत प्रकल्प वास्तुविशारद व कंत्राटदार यांना दिनांक ०४.०७.२०१८ व १६.०७.२०१८ च्या पत्रान्वये सदर सांस्कृतिक भवनाचे बांधकाम तात्काळ पूर्ण करण्याबाबत व यापुढे कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नसल्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार प्रकल्पाचे बांधकाम जलद गतीने सुरु असून प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर (जि. बीड) तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या पदांना मान्यता देण्याबाबत**

**(३८) १२११३९ (२३-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या पदांच्या मान्यतेबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासन स्तरावर प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त तालुक्यांतील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या पदांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०१९) :** (१) व (२) राज्यातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये दि. ०२ मे, २०१२ नंतर ना-हरकत प्रमाणपत्र न घेता नियुक्त केलेल्या शिक्षकांना वैयक्तीक मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नियमबाह्यरित्या ऑनलाईन औषध विक्री सुरु असल्याबाबत

**(३९) १२६४०० (२३-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गर्भपात तसेच इतर औषधांची ऑनलाईन विक्री करताना कंपन्यांकडून विना प्रिस्क्रिप्शन, विना विक्री बिल औषधपुरवठा केला जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भपाताची औषधे, स्टिरोईड, नशा करण्यासाठी लागणारी औषधे इत्यादी ऑनलाईन सहजपणे उपलब्ध होत असून त्याचे मूळ कनेक्शन हे हिमाचल प्रदेश, दिल्ली, बेंगळूर, चेन्नई येथे आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, ऑनलाईन कंपन्यांकडून डिजिटल प्रिस्क्रिप्शन तयार करणे, त्यावर डॉक्टरचा पत्ता नसणे, डॉक्टरांची नावे बनावट असणे तसेच ऑनलाईन फार्मसीद्वारे वेबसाईट देण्यात येणाऱ्या चिट्ठीवरील डॉक्टर हे नोंदणीकृत नसल्याचे एफडीएच्या चौकशीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय औषध महानिरीक्षकांनी औषधांची ऑनलाईन विक्री करण्यासंदर्भात तत्कालीन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून अहवाल पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषी कंपनी व व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०५-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) होय. सदर समितीने त्यांचा अहवाल केंद्र शासनास सादर केला आहे.

(५) अन्न व औषध प्रशासनाने मागील तीन वर्षात प्रिस्क्रिप्शन किंवा प्रिस्क्रिप्शनशिवाय ऑनलाइन औषध विक्री प्रकरणात एकूण ७ प्रकरणी प्रथम खबर अहवाल नोंदविले असून १६ पूरवठादारांचे परवाने रद्द केले आहेत. ०८ पुरवठा दारांचे परवाने निलंबति करण्यात आले आहेत. तर ०५ प्रकरणी मा.न्यायालयात फौजदारी खटले दाखल केले आहेत. ०४ प्रकरणी पुरवठादाराने व्यवसाय बंद करुन परवाने प्रशासनाकडे सादर केल्याने ते रद्द करण्यात आले आहेत. ११ प्रकरणी पुरवठादार अन्य राज्यातील असल्याने त्यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत संबंधित राज्याच्या औषध नियंत्रकास कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

___

## फार्मासिस्ट ने दिलेल्या चुकीच्या औषधामुळे एका व्यक्तीचा झालेला मृत्यु

**(४०) १२६४५८ (२९-१२-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फार्मासिस्टच्या अनुपस्थितीत औषध विक्रेत्याच्या औषधांच्या ब्रॅण्डच्या नावातील सूक्ष्म वेगळेपण लक्षात न आल्याने फॉलिक ॲसिडच्या औषधांऐवजी कर्करोगाचे औषध दिल्याने नऊ महिन्यांपूर्वी श्री.दिगंबर धुरी यांचा मृत्यू झाला असूनही संबधित औषध विक्रेत्यांचा परवाना रद्द करण्यात आला नसल्याचे माहे जुलै, २०१८ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील दोषी औषध विक्रेत्यांचा परवाना रद्द करण्यासंदर्भात तसेच त्याचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणी मे.कल्पेश मेडीकल स्टोअर्स, मालाड (पू) या औषध विक्रेत्याचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आले असून सदर प्रकरणी मालाड पोलिस स्टेशन येथे प्रथम खबर अहवाल (गुन्हा नोंद क्र.३५७/१८) नोंदविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

## आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा रद्द केल्याबाबत

**(४१) १२६७२२ (०४-१२-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाकडून दरवर्षी देण्यात येणारा "आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा" शिक्षण विभागाने दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास रद्द केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा रद्द करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त सोहळा आयोजित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्या येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही

(२), (३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देण्याबाबत**

**(४२) १२६७२३ (०४-१२-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होणाऱ्या सार्वजनिक निवडणूकांमध्ये नवीन मतदार समाविष्ठ करणे तसेच मयत झालेल्या मतदारांची नावे कमी करण्यासाठी बीएलओ म्हणून शिक्षकांची सक्तीने नियुक्ती केली जात असल्याने शिक्षकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून शिक्षकांवर शैक्षणिक कामापेक्षा अशैक्षणिक कामांचा अधिभार वाढत असल्याचे माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे शिक्षक सदर काम स्विकारत नाहीत त्यांच्यावर फौजदारी गुन्हे क्षेत्रिय अधिका-यांकडून दाखल करण्यात येत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकीकडे शासनाचे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र साकारण्याचे उद्दिष्ट असताना मात्र शिक्षक प्रत्यक्ष शिकविण्यापेक्षा अशैक्षणिक कामांमध्ये गुंतला असल्याने शाळा प्रशासन व विदयार्थ्यांचे मोठे नुकसान होतआहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानासही सदर शिक्षकांनाच जबाबदार धरून त्यांना शिक्षा देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आह काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) :** (१) अशंत: हे खरे आहे.

(२) भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० चे कलम ३२ मध्ये अशी तरतुद आहे. परंतु असे गुन्हे दाखल झाल्याच्या तक्रारी प्राथमिक शिक्षण संचालनालयास प्राप्त नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

**शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) चे पर्यवेक्षण करणाऱ्या शिक्षकांना मानधन देण्याबाबत**

**(४३) १२६९२१ (०६-१२-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) होवून दोन महिने उलटून गेले असले तरी या परीक्षेचे पर्यवेक्षण करणाऱ्या शिक्षकांना मानधन मिळाले नसल्याचे दिनांक १० ऑक्टोबर,२०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शिक्षकांना मानधन देण्यात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (०८-०३-२०१९) :** (१) व (२) शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) परीक्षेचे पर्यवेक्षण करणा-या शिक्षकांचे मानधनाची रक्कम परीक्षा सुरु होण्यापुर्वीच संबंधित जिल्ह्याच्या परीक्षा नियंत्रकाच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आली होती. तथापि, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभागातील शिक्षकांना विलंबाने मानधन वाटप केल्याचे दिसून आल्याने त्यांच्याकडून त्याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवतनाही.

---

**मुंबईतील अनेक चायनीज गाडयांवरील खादयपदार्थात रोगट कोंबडयांच्या मांसाचा वापर होत असल्याबाबत**

**(४४) १२७२७९ (२९-१२-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काही चायनीज गाडयांवर खादयपदार्थात रोगट कोंबडयांच्या मांसाचा वापर होत असल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवडी येथील ए.डी. मनीष खंडागळे हा मांस विक्रेता मेलेल्या कोंबडयाचे मांस चायनिज विक्रेत्यांना पुरवत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर मांस विक्रेत्यावर कारवाई करणे तसेच मुंबईतील इतर चायनीज विक्रेत्यांची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) होय.

(२) अन्न व औषध प्रशासनाने आचार्य दोंदे मार्ग शिवडी, मुंबई येथील बारादेवी झोपडपट्टी या ठिकाणी दि.०४ ऑगस्ट, २०१८ रोजी धाड टाकली असता सदर ठिकाणी प्रवीण नरेश म्हात्रे व मनीष लक्ष्मण खंडागळे हे जमीनीवर साठवलेल्या मेलेल्या कोंबड्यांची मांस कटिंग करण्याचे काम अस्वच्छ ठिकाणी करीत असल्याचे आढळून आले. सदर मेलेल्या कोंबड्यांचा मुंबई शहरातील चायनीज गाड्यांना पुरवठा होत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाने चौकशी करुन प्रवीण नरेश म्हात्रे व मनीष लक्ष्मण खंडागळे यांचे विरुध्द मा.अतिरीक्त मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात खटला क्र. ४६००३००/एसडब्लु/१८ दाखल करण्यात आला आहे.

तसेच या अनुषंगाने संपूर्ण मुंबई शहरात चायनीज अन्न पदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी मोहिम राबविण्यात आली असून एकूण ५६ तपासण्या करण्यात आल्या असून उल्लंघन आढळलेल्या २६ प्रकरणी रु.१,४८,५००/- तडजोड शुल्क वसुल करण्यात आले आहे. तथापि, उक्त ५६ ठिकाणी केलेल्या तपासणीत मेलेल्या कोंबड्यांचे मांस वापरत असल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खासगी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेत विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत

**(४५) १२७४४९ (०६-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी अनुदानित आणि विना अनुदानित शाळांत शिक्षण शुल्काच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणुक होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यानुसार खासगी अनुदानित आणि विना अनुदानित शाळांची तपासणी वा चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबा कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२७-०२-२०१९) :** (१) शिक्षण शुल्काच्या अनुषंगाने काही शाळांबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडे तक्रारी प्राप्त आहेत.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय उपसंचालक यांचे स्तरावरुन चौकशी व तपासणी करुन महाराष्ट्र शैक्षणिक (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ नुसार कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील आनंदनगर एमआयडीसीमधील व्हर्टिव्ह एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतील कामगारांना जेवणातून झालेली विषबाधा**

**(४६) १२७४५१ (२९-१२-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील आनंदनगर एमआयडीसीमधील व्हर्टिव्ह एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतील १८ कामगारांना जेवणातून विषबाधा झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) व (२) अशा आशयाची बातमी एबीपी माझा या वृत्तवाहीनीवर प्रसिध्द झाली असता या संदर्भात अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असून कॅन्टीनमध्ये अन्न पदार्थ पुरवठा करणारी मे.अन्नपुर्णा केटरर्स (मे.व्हर्टीव्ह एनर्जी प्रा.लि.) अंबरनाथ (पू.), ठाणे या पेढीची दि.०७/०९/२०१८ तपासणी करुन सदर घटना घडलेल्या दिवशी अन्न तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कच्चा अन्नपदार्थाचे एकूण ०५ नमुने विश्लेषणासाठी घेतले होते. सदर सर्व नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत. सदर तपासणीत आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने पेढीचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

तसेच शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ यांनी सदर घटना घडलेल्या दिवशी कामगारांना पुरविण्यात आलेल्या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी पाठविले होते. सदर अहवालामध्ये "The Result are as above. The specific reason/ causative agent of food poisoning could not be found" असा निष्कर्ष उपसंचालक, राज्य आरोग्य प्रयोगशाळा यांनी दिला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनावट व निकृष्ट दर्जाच्या औषधांची निर्मिती करणाऱ्या गल्फा लॅबोरेटरीज लिमिटेड तसेच इतर कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४७) १२९११५ (२९-१२-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नामांकित कंपन्याच्या औषध उत्पादनांप्रमाणे हुबेहुब बनावट व निकृष्ट दर्जाच्या औषधांची निर्मिती करीत असल्याच्या आरोपामुळे गल्फा लॅबोरेटरीज लिमिटेड या औषध निर्मिती कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांना मुंबई उच्च न्यायालयाने दीड कोटीचा दंड ठोठावला असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट व निकृष्ट दर्जाच्या औषधांमुळे नागरीकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत असल्याने अशा कंपन्यावर नियंत्रण आणण्याकरिता शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे. तथापि, सदर दंड बनावट व निकृष्ठ दर्जाच्या औषध निर्मितीबाबत नसून Trademark infringmint बाबत आहे.

(२) सदर खटला बनावट व निकृष्ट औषधे किंवा औषधाच्या दर्ज्याशी संबंधित नसल्याने अन्न व औषध प्रशासनाकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवतनाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती शहरातील दुध भेसळ रोखण्याबाबत**

**(४८) १२९९४२ (२९-१२-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात मोठया प्रमाणात दुध भेसळ होत असल्याचे अन्न व औषधी प्रशासन विभागाने तपासलेल्या नमुन्यावरुन माहे सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शहरातील दुध भेसळ रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) दुध भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडुन वेळोवेळी तपासणी मोहिम राबविण्यात येते.

अमरावती शहरात माहे एप्रिल, २०१८ पासून माहे फेब्रुवारी, २०१९ पर्यंत दुधाचे ०९ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून त्यापैकी ०५ प्रमाणित व ०४ नमुने कमी दर्जाचे घोषित झाले आहेत. ०४ कमी दर्जाचे प्रकरणी न्याय निर्णय / तडजोड कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ (जि. सांगली) परिसरातील पाणी आणि पालेभाज्यांमध्ये आरोग्याला घातक असणारे घटक आढळून आल्याबाबत**

**(४९) १३०२६२ (२९-१२-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि. सांगली) परिसरातील पाणी आणि पालेभाज्यांमध्ये मानवी आरोग्याला घातक असणारे घटक आढळून आल्याचा अहवाल कर्नाटकमधील रायपूर येथील यूनिवर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चर सायन्सेसच्या पेस्टिसाईडम रेसिडयू ॲण्ड फूट क्वॉलिटी ॲनलिसिस लॅबोटरी या संस्थेने माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) नाही. अशा प्रकारचा अहवाल अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झालेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील हॉटेल मधील भटारखान्यांच्या तपासणीबाबत**

**(५०) १३१०९४ (२९-१२-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील हॉटेल मधील अस्वच्छ भटार खाने, पेस्ट कंट्रोल, कर्मचाऱ्यांचे आरोग्य व स्वच्छतेकडे हॉटेल चालकांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाकडून हॉटेलला हायजिन रेटिंग देण्याची प्रक्रिया सुरु केली असली तरी काही महिन्यापासून संकेत स्थळावरील तांत्रिक त्रुटीमुळे हायजिन रेटिंगचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, केवळ अर्ज करणाऱ्या हॉटेलांची तपासणी न करता नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने FDI कडून सर्वच हॉटेलांची करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०५-२०१९) :** (१) हे अशंत: खरे आहे.
(२) पुणे विभागात ६२ हॉटेल्सनी हायजीन रेटींग प्रमाणपत्र मिळण्याकरता अर्ज केले असून त्यापैकी २१ हॉटेल्सना हायजिन रेटींग प्रमाणपत्र मंजूर करण्यात आले आहे. तर ४१ अर्ज तपासणी करीता प्रलंबित आहेत त्यामुळे स्थळावरील तांत्रिक त्रुटीमुळे हायजिन रेटिंगचे काम प्रलंबित आहे हे खरे नाही.
(३) नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टिने अन्न व औषध प्रशासनाकडून अर्ज करणाऱ्या तसेच अर्ज न करणाऱ्या अनेक हॉटेल्सची वेळोवेळी तपासणी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.